**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. लक्ष्मण मोरेश्वर ओतारी<br>रा. एकता कॉलनी, पो. ता. आजरा,<br>जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,<br>कोल्हापूर, जि. कोल्हापूर | प्रतिनिधी<br>हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,<br>कोल्हापूर विभाग, जि. कोल्हापूर | हजर |

आजरा मर्चंटस् को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि., आजरा, जि. कोल्हापूर संस्थेच्या निवडणूक घोषणेच्या बाबत दिलेले तक्रार अर्ज कशा प्रकारे निकाली काढले, याची माहिती अपीलकर्त्याने मागितली होती.

अपीलकर्त्याने माहिती मिळाली असल्याचे वरील तीन घटकांत झालेल्या चर्चेत मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.६.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. संजय विजय भिडे<br>११११, उत्तर शिवाजीनगर, गणपती गॅस गोडावून जवळ,<br>सांगली : ४१६ ४१६ |
| ३ | जन माहिती अधिकारी | स्वीय सहाय्यक, विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन)<br>विक्रीकर भवन, येरवडा, पुणे-६ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विक्रीकर सह आयुक्त,<br>विक्रीकर भवन, येरवडा, पुणे-६ |

अपीलकर्ता श्री. संजय विजय भिडे यांनी पुणे महानगरपालिका क्षेत्रातून दि. १.४.१९९६ ते ३१.३.२००६ या कालावधीत मिळालेल्या व्यवसायकर उत्पन्नाची माहिती विचारली होती. परंतु पुणे महानगरासह पुणे जिल्ह्यातील सर्व भागातील जमा होणाऱ्या व्यवसाय कराची रक्कम एकाच लेखाशिर्षाखाली जमा केली जाते. त्यामुळे अशा प्रकारची विभागवार माहिती उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही, हे जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्याच्या निर्दशनास आणले असता अपीलकर्त्याने अपील निकाली काढण्याबाबत कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०३.६.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. अरविंद दादा जाधव<br>शासकीय दुध योजना, सी-३,<br>एम.आय.डी.सी., जि.सातारा -४१५ ००४ |
| ३ | जन माहिती अधिकारी | महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना मरिआई गेट पोलीस चौकीजवळ, मुंबई - पुणे रस्ता, पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कॉमन वेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे -३० |

अपीलकर्त्याने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे वेतनामध्ये झालेल्या बदलानुसार अतिकालिक भत्ता व पगारी सुट्ट्या बाबतच्या वेतन फरकाच्या अनुषंगाने ना देय प्रमाणपत्राची मागणी केली आहे. याबाबत वरील तीनही घटकात झालेल्या चर्चेनुसार याबाबतची प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नसल्याने अपिलकर्त्यास ना-देय प्रमाणपत्र पाठविण्यात आलेले नाही. असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. तथापि याबाबतची प्रक्रिया सुरु असून नव्वद दिवसात माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) विहित मुदतीत अपिलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देवून त्याचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करण्यात यावा.

पुणे
दि. ४.०६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०/ सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर ,<br>३१ अंजली, कॉलनी, गेंडामाळ, शाहुपरी,<br>जि.सातारा -४१५ ००२ |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कॉमन वेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे -३० |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कॉमन वेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे -३० |

वरील तीनही घटकात झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्यास कालबध्द पदोन्नतीच्या आदेशाची प्रत अपील कर्त्यास मिळाली असल्याने अपील निकाली काढण्यास अपीलकर्त्याने अनुमती दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ४ .०६.२००८

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०/ सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी<br>मु.पो.कुर्डूवाडी, श्रीदत्त रोड ता. माढा, जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी,<br>सोलापूर यांचे कार्यालय, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपविभागीय अधिकारी, सोलापूर विभाग, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता गैरहजर, उपविभागीय अधिकारी, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या कार्यकक्षेतील तालुकानिहाय, नियमबाह्य, विहित परवान्याविना तात्पुरत्या स्वरूपातील, लेखी आदेशावर सुरू असलेले बेकायदेशीर रॉकेल वाटप करणाऱ्या विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई का केली नाही, याचा खुलासा मिळावा, अशी मागणी अपीलकर्त्याची 'माहिती' म्हणून केली होती. मूळ अर्जानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील केले नसल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. नेमकी कोणती माहिती पाहिजे, अशी लेखी विचारणा जन माहिती अधिकाऱ्यांनी केल्यानंतरही अर्जदाराने कळविले नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' च्या व्याख्येत खुलाशाची मागणी येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.०६.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश रामभाऊ टाकळकर
'श्रीराम', कोर्टाजवळ, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०० / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश रामभाऊ टाकळकर
'श्रीराम', कोर्टाजवळ, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे डॉ.एस.डी.मुंडे, विद्यमान
श्री.आनंद सु.भंडारी, तत्कालीन

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे श्री.एस.ए.खंडागळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.८.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | राजगुरुनगर शहर व लगत ५ कि.मी.अंतरामध्ये काम करणारे पाच वर्षाहून अधिक काळ सेवा झालेल्या (एकाच ठिकाणी), ५ ते १० वर्षे कालावधी एकाच ठिकाणी सेवा झालेल्या शिक्षकांची तपशीलवार माहिती, तालुक्याचे पश्चिम भागातील मुलांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांना ग्रामीण भागात पाठविण्याबाबत निर्णयाचा तपशील, आदिवासी भागात ज्यांनी जास्त वर्षे काम केले आहे त्यांना शहरी भागात काम करण्याची संधी मिळणार आहे काय, बदल्यांच्या नवीन नियमाप्रमाणे बदल्या होणार आहेत काय |

## विवेचन

राजगुरुनगर व शहर परिसरातील पाच वर्षांहून अधिक काळ एकाच ठिकाणी सेवा झालेल्या शिक्षकांसंबंधीची माहिती अपीलकर्ता श्री.सुरेश रामभाऊ टाकळकर यांनी मागितली होती. दि.१८.७.२००६ च्या अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२८.७.२००६ रोजी माहिती दिली. माहिती देण्यास विवलंब झाल्याच्या कारणावरुन श्री.टाकळकर यांनी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले. शिक्षण विभागास एकवेळ ताकीद द्यावी व माहिती विहित मुदतीत देण्याची दक्षता घ्यावी, असा निर्णय देऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, या मागणीसाठी श्री.टाकळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

तत्कालीन गटशिक्षणाधिकारी व गटविकास अधिकारी यांनी आपल्या अर्जाची व अपिलाची योग्य दखल न घेतल्याची तक्रार श्री.टाकळकर यांनी आयोगापुढील सुनावणीत केली, मात्र आपल्या अर्जाव्यतिरिक्त कोणतीही कागदपत्रे आपल्याकडे नसल्याचे त्यांनी नमूद केले. राजगुरुनगर तालुक्याच्या पश्चिम भागामधील मुलांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी आपणांकडून या निष्णात शिक्षकांना ग्रामीण भागात पाठविण्याबाबत काही हालचाली सुरु आहेत काय? बाहेरील इसमांकडून दबावामुळे बदल्यांच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राहणार किंवा कसे? अशा स्वरुपाचे आगामी नियोजनात्मक व अन्य स्वरुपाचे भाष्य अपेक्षित असलेले असे प्रश्न माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती 'या सदरात समाविष्ट होत नाहीत. त्यामुळे त्यांचा विचार करण्याचे कारण

'संपूर्ण तालुक्यातील माहिती द्यावयाची असल्यामुळे बारा दिवस विलंब झाला', असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एस.ए.खंडागळे व अपिलीय प्राधिकारी डॉ.एस.डी.मुंडे यांनी स्पष्ट केले. 'खेड विकास गटामध्ये ३८१ शाळा असून १४४८ शिक्षक कार्यरत होते. प्रत्येक शाळानिहाय व शिक्षकनिहाय शाळेवर कार्यरत दिनांक, एका शाळेवर पाच वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेले शिक्षक, त्याचप्रमाणे एका शाळेवर दहा वर्षांपेक्षा सेवा झालेले शिक्षक अशा प्रकारची माहिती काढण्यास वेळ लागला. त्यामुळे माहिती वेळेवर देऊ शकलो नाही', असा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी श्री.एस.ए.खंडागळे यांनी केला. तो मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरत नाहीत.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३.६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००/ सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री चौडप्पा बसवणप्पा झुंजा.<br>मु.पो.मैंदर्गी,ता.अक्कलकोट,<br>जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | श्रीम.शकुंतला गायकवाड.<br>प्रमुख लिपीक ,जिल्हाधिकारी<br>कार्यालय ,सोलापूर. | हजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | श्री सिध्दाराम सालीमठ.<br>निवासी उपजिल्हाधिकारी,सोलापूर. | हजर |

अपीलकर्ता श्री चौडप्पा बसवणप्पा झुंजा यांनी सहायक कामगार आयुक्त, कामगार न्यायालयाच्या निर्णयानुसार रक्कम वसुलीविषयीची माहिती मागितली होती. तसेच ग्रॅच्युईटीची रक्कम मिळण्याची मागणी केली होती.जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. वसुलीच्या कार्यवाहीचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कक्षेत येत नाही. तथापि अपीलार्थीच्या मागणीनुसार वसुलीची कार्यवाही पूर्ण केली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २६.०६.२००८

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०७ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुरेश विनायक नानिवडेकर<br>५१०, श्री शिवशंकर अपार्टमेंट, सेक्टर १६,<br>एरोली, नवी मुंबई- ४०० ७०८ |
| ३ | जन माहिती अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर |
| ५ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | वेतनवाढ व पेन्शनवाढीचा फरक मिळणेबाबत माहिती |

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्यास माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले आहे. तथापि वेतनवाढीचा व पेन्शनवाढीचा फरक मिळावा, अशी विनंती केली आहे. सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. परंतु त्याबाबतची रीतसर कार्यवाही सुरू असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** ५ .६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. हारून सुलतान सय्यद
मु.पो. माळेगाव बु., ता.बारामती,
जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती, बारामती, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
ग्रामविकास अधिकारी, माळेगाव बु., ता. बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. हारून सुलतान सय्यद
मु.पो. माळेगाव बु., ता.बारामती, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, माळेगाव बु.,
ता. बारामती, जि.पुणे श्री. अंकुश किसन खांडेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.८.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि. २४.१२.२००४ रोजी गाळा भाडे तत्वावर मिळणेसाठी केलेल्या लेखी अर्जाबाबत खुलासा

## विवेचन

भाडेतत्वावर ग्रामपंचायतीचा गाळा देण्याची मागणी दि. १६.११.२००४ रोजी आपण केली होती. त्यावरील कार्यवाहीबाबतच्या खुलाशाची मागणी अपीलकर्ता श्री. हारून सुलतान सय्यद यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, माळेगाव बु., ता. बारामती, जि. पुणे यांच्याकडे केली होती. ग्रामपंचायतीच्या मासिक सभेपुढे हा विषय ठेवून निर्णय कळवू असे जन माहिती अधिकाऱ्यांनी तोंडी सांगितले. परंतु आपल्याला माहिती टाळली जात असल्याच्या कारणावरून श्री. सय्यद यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, (पंचायत) पंचायत समिती, बारामती, जि. पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याचे अपील फेटाळले. त्याविरूध्द श्री. सय्यद यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सुशिक्षित बेरोजगार युवक संघटनेला ग्रामपंचायत गाळा देण्याची मागणी आपण दि. १६.११.२००४ रोजी केली होती. त्यानंतर दि. २४.१२.२००४ रोजी स्मरणपत्रही दिले होते. मात्र त्वरित गाळा दिला गेला नाही, असे श्री. सय्यद यांचे म्हणणे असून दि. २४.१२.२००४ च्या अर्जाबाबत माहितीच्या अधिकारात खुलासा मागणारे अर्ज त्यांनी दि. ३१.५.२००६ रोजी केले. या अर्जांचा निर्णय घेणे आपल्या अखत्यारीतील बाब नसल्यामुळे ग्रामपंचायतीच्या मासिक सभेपुढे अर्ज ठेवून निर्णय कळविण्यात येईल, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना तोंडी सांगितले. श्री. सय्यद यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी हे मान्य केल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रात म्हटले आहे. दि. २९.६.२००६ रोजी ग्रामपंचायतीची मासिक बैठक झाल्यानंतर दि. ३.७.२००६ रोजी माहिती दिली, असे अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. रूपये पंधरा अनामत व दरमहा ३००/- रूपये भाडे अशा अटींवर हा गाळा देण्याचा ठराव झाला. गाळा दिला, परंतु नंतर तो काढून घेतला, असे श्री. सय्यद यांनी सांगितले. परंतु गाळा काढून घेतला नसून थकबाकी असल्यामुळे सील केला आहे, असे विद्यमान ग्रामविकास अधिकारी श्री. खांडेकर यांनी स्पष्ट केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्याबाबत हेतुतः विलंब केल्याचे दिसून येत नाही. ग्रामपंचायतीचा निर्णय झाल्यानंतर अपीलकर्त्यास ही माहिती त्यांनी त्वरित दिली आहे. संबंधित

संघटनेला गाळा देणे, न देणे व त्या अनुषंगिक बाबी हा प्रशासकीय विषय असून तो माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती' या सदरात येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. १६.६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकर अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले दाखल**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.प्रकाश गणपती देसाई
मु.पो.आरग, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर)
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहित्ती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, मोहनराव शिंदे सहकारी
साखर कारखाना मर्यादित, मोहननगर, आरग, ता.मिरज, जि.सांगली

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | २०८/सांगली / २००६ |
| २.सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | १४.५.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर)
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.डी.एस.साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, मोहनराव शिंदे सहकारी
साखर कारखाना मर्यादित, मोहननगर, आरग, ता.मिरज, जि.सांगली
श्री.सूर्यकांत भिमराव पाटील

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | ५.६.२००६ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | १.७.२००६ |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | ११.७.२००६ |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | २९.७.२००६ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

प्रस्तावीत २५०० ते ४००० मे.ट.गाळप क्षमता करण्यासाठी व १२ मेगावॅट वीज निर्मिती करण्यासाठी श्री रेणुका शुगर्स किती रक्कम गुंतवणार आहे त्याची माहिती व निर्माण झालेली वीज स्वत: किती वापरणार व किती विकणार त्याचा रकमेसह तपशील, तसेच करारानंतर आणखी ६ वर्षेपर्यंत रेणुका शुगर्सला द्यावयाची वीज व वाफ किती रकमेची याचा सविस्तर तपशील मिळावा.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.प्रकाश गणपती देसाई यांनी वीज निर्मितीसाठी श्री रेणुका शुगर्स किती रक्कम गुंतवणार, तसेच निर्माण होणाऱ्या विजविषयक बाबींची माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना मर्यादित, मोहनगनर, आरग, ता.मिरज, जि.सांगली यांच्याकडे मागितली होती. माहिती मागण्याचा अपीलकर्ता यांना अधिकार नाही या कारणास्तव जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१.७.२००६ च्या पत्राने माहिती नाकारली. त्यावर अपीलकर्ता यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. ज्या माहितीमुळे कारखान्याच्या गोपनीयतेचा भंग होणार नाही अशी माहिती अपीलकर्ता यांना १५ दिवसाचे आंत नि:शुल्क देण्याबद्दल कारखान्यास निर्देश अपिलीय प्राधिकारी यांनी दिले व अपील निकाली काढले. अपीलकर्ता यांना हा आदेश मान्य नसलेने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

प्रस्तुतच्या अपिलाचा समावेश दिनांक १८.३.२००८ रोजी विशेष अपील निर्गत मोहिमेमध्ये करण्यात आला होता. या रोजी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे

तिघेही हजर होते. अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली असल्याने सदरचे अपील काढून घेण्याची अपीलकर्त्याची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोल्हापूर
दि.२६.६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ